२० वर्षांची अस्थायी सेवा पूर्ण झाल्यानंतर नियत वयमानावर सेवानिवृत्त होणाऱ्या अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यास निवृत्तिवेतनविषयक लाभ देणे.

महाराष्ट्र शासन

**वित्त विभाग**

शासन निर्णय क्रमांक सेनिवे-१०८५/सीआर-१८६० (ब)/सेवा-४

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ फेब्रुवारी १९८६

**शासन निर्णय**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ३० च्या परंतुकानुसार, जर शासकीय कर्मचारी सेवानिवृत्तीच्या वेळी एखादे स्थायी पद कायमपणे धारण करीत असेल, अथवा निलंबित धारणाधिकार किंवा स्थायित्व प्रमाणपत्र धारण करीत असेल, तर तो निवृत्तिवेतन व मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदानास पात्र होतो. जो शासकीय कर्मचारी सेवानिवृत्तीच्या वेळी वरील अटी पूर्ण करीत नाही, तो निवृत्तिवेतन व मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदानास पात्र होत नाही. परंतु उपरोक्त नियमांच्या परिशिष्ट दोन मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदीनुसार तो सेवान्त लाभास पात्र होतो.

२. जे शासकीय कर्मचारी प्रदीर्घ सेवा केल्यानंतर कोणत्याही पदावर कायम झाल्याशिवाय सेवानिवृत्त होतात किंवा त्यांना स्थायित्व प्रमाणपत्र दिले जात नाही, त्यांना निवृत्तिविषयक लाभ देण्याचा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधीन होता. शासन असा आदेश देत आहे की, जो शासकीय कर्मचारी २० वर्षांपेक्षा कमी नाही एवढी अस्थायी सेवा केल्यानंतर, नियत वयमान प्राप्त झाल्यामुळे सेवानिवृत्त झाला असेल, किंवा समुचित वैद्यकीय प्राधिकाऱ्याने त्याला पुढील सेवेसाठी कायमचे असमर्थ ठरविले असेल, त्याला निवृत्ति-वेतन नियम लागू होतील व त्याने बाबतीत एखादे पद कायमपणे धारण करणे किंवा स्थायित्व प्रमाणपत्र धारण करण्याबाबतची अट पूर्ण करणे आवश्यक राहणार नाही. परिणामत: अशा शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या तरतुदींनुसार नियत वयमान निवृत्तिवेतन किंवा रुग्णता निवृत्तिवेतन, मृत्यू-नि-सेवानिवृत्ति उपदान आणि त्यांच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्ति-वेतन मिळेल.

३. वरील परिच्छेदाच्या प्रयोजनासाठी अस्थायी सेवेची परिगणना करण्याकरिता महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ अनुसार सेवेचा जो कालखंड अनर्हताकारी मानण्यात आलेला आहे तो लक्षात घेतला जाणार नाही. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ४८ अनुसार क्षमापित होण्यासारखे असतील असे सेवेतील खंड वगळता, इतर एक किंवा अनेक सेवाखंडांमुळे पूर्वीचा सेवेवरील हक्क गमावला जाईल.

४. या शासन निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये उल्लेखिलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील परिशिष्ट दोन मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदी यापुढे लागू होणार नाहीत.

५. हे आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेस जे अस्थायी शासकीय कर्मचारी सेवेत आहेत त्यांना या शासन निर्णयाच्या तरतुदी लागू होतील.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील यासंबंधीच्या विद्यमान तरतुदींमध्ये या शासन निर्णयाच्या तरतुदींपुरती सुधारणा करण्यात आली आहे असे मानण्यात यावे. उपरोक्त नियमांत रीतसर सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[illegible],
शासनाचे सह सचिव.

प्रति

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,

(शा.म.मु.) रन २२३२/ए-४ (१२,०००-६-८६)

[कृ. मा. प.